N.C.R.B.
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण ...)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर

**P.S.(ठाणे):** भारती विद्यापीठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0160

**Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/02/2024 08:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 21/02/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/02/2024

**Time From (वेळेपासून):** 18:16 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/02/2024

**Time (वेळ):** 08:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 011

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2024 08:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीस्वामी समर्थ स्नक्स सेंट,सुखसागरनगर पोलीस चौकी समोर ,सुखसागर नगर कात्रज , पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल बबन डावखर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वरद रेसिडन्सी फलट नं1 ,बिरदेवनगर फलटण ता,फलटण जिसातारा,भारती विद्यापीठ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वरद रेसिडन्सी फलट नं1 ,बिरदेवनगर फलटण ता,फलटण जिसातारा,भारती विद्यापीठ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तुषार शितल बनकर | | | 1. कुटुंब सोसायटी ,फलट नं-111,आंबेगाव पठार,पुणे , भारती विद्यापीठ,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 25000/ | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.22/02/2024.

श्री.सुनिल बबन डावखर,वय-42 वर्षे ,धंदा –नोकरी ,रा.वरद रेसिडन्सी फलॅट नं.1 बिरदेवनगर फलटण ता. फलटण जि.सातारा,मो.नं.7385223399

समक्ष हजर राहून जबाब लिहुन देतो की दि.13/02/2024 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे माझेकडे लाच मागणी केल्याबद्दल लेखी तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे, “माझ्या विरोधात भारती विदयापिठ पोलीस ठाणे ,पुणे येथे सॉफटवेअरचे विक्री व्यवहारा संदर्भात ऑनलाईन तक्रार ज्ञानेश यांनी दिली असल्याचे पोलीस शिपाई तुषार बनकर व पोलीस उप निरीक्षक संजय नरळे यांनी फोनवर कळविल्याने मी त्यांना भेटण्यासाठी दिनांक- 10/02/2024 रोजी भारती विदयापिठ पोलीस चौकी येथे गेलो असता पोलीस शिपाई बनकर यांनी माझ्या विरुध्दचे तक्रार अर्जामध्ये साहेबांना सांगुन तुला मदत करतो असे सांगून अर्जदार ज्ञानेश यांना दयावयाचे रकमेव्यतिरिक्त 1 लाख रुपये लाच मागणी करुन सदरची रक्कम पोलीस उप निरीक्षक नराळे यांना दयावयाची असल्याचे सांगितले.पोलीस शिपाई बनकर यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असुन ती देण्याची माझी इच्छा नाही माझे व त्यांचेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही सदरबाबत त्यांचेवर कारवाई व्हावी”.वगैरे मजकुर ची तक्रार दिली.

त्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीची पडताळणी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणेचे पोलीस निरीक्षक श्री निंबाळकर यांनी दि.13/02/2024 रोजी शासकिय पंचासह पडताळणी कामी भारती विदयापिठ पोलीस स्टेशन ,पुणे येथे पाठविण्यात आले. तेथुन माझे मोबाईल नं-7385223399 वरुन पोलीस बनकर यांचे मोबाईल क्र.8208134757 फोन करुन तो व्हॉईस रेकॉर्डवर रेकॉर्ड केला असता त्यांनी मला निलगिरी चौक येथील हॉटेल मॅजेस्टिक येथे भेटण्यास बोलावले. सदर ठिकाणी भेटी दरम्यान पोलीस बनकर यांनी माझेविरुध्द दाखल तक्रार अर्जामध्ये नरळे साहेबांना सांगुन मदत करण्यासाठी व सदरचे प्रकरण मिटविण्यासाठी तडजोडीअंती पंचासमक्ष पंचवीस हजार रुपये लाचेची मागणी केली व मला फलटण येथे गावी जाणेसाठी उशीर होत असलेने पोउपनि नरळे यांची भेट घेतली नाही. त्यानंतर मी लाचलुचपत कार्यालय,पुणे येथे परत आलो. परत आल्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना झालेल्या चर्चेबाबत सांगीतले, त्यावेळी त्यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण देखील ऐकले. सदर भेटीदरम्यान माझेत व पोलीस बनकर यांचेत कामासंदर्भात व लाचेसंदर्भात चर्चा झाली व लाच मागणी झालेचे निष्पन्न झाले.त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी बनकर यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम हजर करणेस सांगितले. परंतु सदर वेळी माझेकडे पैसे नसल्याने मला पैशाची जुळवाजुळव करण्यासाठी,वेळ लागणार असुन माझ्याकडे लाच रकमेची उपलब्धता झाल्यानंतर मी बनकर यांनी मागणी केलेल्या लाच रकमेसह हजर राहील असे सांगितल्याने दि.13/02/2024 रोजी ची सदरची कारवाई तात्पुरती सर्वानुमते स्थगित करण्यात आली.

बनकर पोलीस यांनी माझ्याकडे माझ्याविरुध्दच्या अर्जामध्ये मदत करणेसाठी साहेंबांना पैसे दयावे लागतील असे सांगुन पंचवीस हजार रुपयेची लाच मागणी केल्याने माझ्याकडे लाच रकमेची उपलब्धता झालेनंतर मी लाच रकमेसह दि.20/02/2024 रोजी ला.प्र.वि कार्यालयात हजर राहीलो.सदर वेळी पोलीस उप निरीक्षक नरळे यांची लाच मागणी संदर्भात पडताळणी करणेकामी मला शासकिय पंचासह व्हॉईस रेकॉर्डर सह भारती विदयापिठ पोलीस स्टेशन ,पुणे येथे पाठविण्यात आले तेथुन माझे दुरध्वनीवरुन पोलीस बनकर यांचे दुरध्वनीवर फोन करुन तो व्हॉईस रेकॉर्डवर रेकॉर्ड केला असता त्यांनी मला हॉटेल मॅजेस्टिक येथे भेटण्यासाठी बोलावल्याने सदर ठिकाणी त्यांची भेट

झाली असता त्यांनी नरळे साहेब यांचेसाठी एक लाख रुपयाची मागणी करुन टप्पे टप्पे करुन दया असे बोलुन पंचवीस हजार रुपये ची मागणी केली.सदर वेळी नरळे साहेब हे मिटींगमध्ये असल्याने त्यांची भेट झाली नाही. चर्चेनंतर मी लाचलुचपत कार्यालय,पुणे येथे परत आलो.परत आल्यानंतर पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण देखील ऐकले. सदर भेटीदरम्यान माझेत व पोलीस बनकर यांचेत कामासंदर्भात व लाचेसंदर्भात चर्चा झाली व लाच मागणी झालेचे निष्पन्न झाले.सदरची कारवाई सर्वानुमते तात्पुरती स्थगित करण्यात आली त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दि.21/02/2024 रोजी मी पुन्हा ला.प्र.वि पुणे येथे हजर आलो असता पोलीस बनकर व पोउपनि नरळे यांची भेट घेण्यासाठी मला शासकिय रेकॉर्डरसह सुखसागरनगर पोलीस चौकी या ठिकाणी पाठविले परंतु साहेब कोर्टमध्ये गेल्यामुळे व बनकर हे सदर ठिकाणी न आलेने त्यांची भेट होऊ शकली नाही व त्यांचेकडे पडताळणी होऊ शकली नाही त्यामुळे त्यांची वाट पाहुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.माझे मोबाईलवर पोलीस बनकर यांचा फोन आल्याने तो व्हॉईस रेकॉर्डवर रेकॉर्ड केला असता बनकर याने नरळे साहेब सुखसागर चौकीला आलेले आहेत तुम्ही या असे सांगुन मला पैसे घेऊन बोलवल्याने शासकीय पंचांसह व्हॉईस रेकॉर्डर सोबत देवुन माझेकडे मागणी झालेली अँथ्रॅसीन पावडर लावलेली लाच रक्कम बनकर यांना देण्यासाठी मला रवाना केले, त्यानंतर माझे पाठोपाठ पोलीस निरीक्षक निंबाळकर व त्यांचे पथक असे सुखसागर पोलीस चौकीचे बाहेर आजुबाजुस थांबुन राहीले. मी सुखसागर पोलीस चौकीचे समोर बनकर यांची भेट घेतली. त्याने मागणी केलेल्या रकमेबाबत विचारणा करुन एक लाख रुपये कॅश देताय म्हणुन सांगतो साहेबांना असे म्हणुन आता तुमच्याकडे किती पैसे आहेत विचारले असता मी 25,000/- रुपये आणलेत असे म्हणालो असता पोलीस बनकर हे मी साहेबांना एक आणलेत असे बोलुन त्यांनी साहेबांसाठी पैशाची मागणी केली व त्यानंतर नरळे साहेबांच्या केबीन मध्ये साहेबांना भेटण्यासाठी घेऊन गेले. सदर ठिकाणी माझे विरुध्दचे सॉफटवेअर विक्रि संदर्भातील ऑनलाईन अर्जा संंबंधात पोउपनि नरळे व आमचेत चर्चा झाली.

त्यानंतर चौकीमधुन बाहेर आल्यानंतर श्री.स्वामी समर्थ स्नॅक्स सेंटर समोर पोलीस बनकर यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाच रकमेची मागणी केली असता मी पंचवीस हजार रुपये त्यांचे समोर धरले असता त्यांनी उजव्या हाताने स्विकारुन मोजुन घेऊन पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवले त्यानंतर मी ठरलेला इशारा केला व निंबाळकर साहेबांच्या पथकाने त्यांना जागीच पकडले ती वेळ अंदाजे 18.16 वा. ची होती. त्याचेकडुन त्याने स्विकारलेली 25,000/- रु रक्कम जप्त केली. सदरवेळी सदर इसमास त्यांचे नाव तुषार शितल बनकर ,वय-30 वर्षे ,व्यवसाय -इंपोर्ट –एक्सपोर्ट ,रा.कुटुंब सोसायटी ,फलॅट नं-111 आंबेगाव पठार,पुणे असे सांगितले व तो पोलीस नसुन खाजगी इसम असल्याचे सांगितले.या कारवाई दरम्यान झालेले संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे व पुढील कागदोपत्री कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी माझे विरुध्द भारती विदयापिठ पोलीस स्टेशन सायबर युनिट येथे दाखल ऑनलाईन तक्रार अर्जामध्ये चौकशी अधिकारी पोउपनि संजय नरळे साहेबांना सांगुन मदत करण्यासाठी व प्रकरण मिटविण्यासाठी खाजगी इसम तुषार शितल बनकर याने पोलीस असल्याचे भासवुन साहेबांना देण्यासाठी म्हणुन एक लाख रुपयाची मागणी करुन टप्प्या टप्प्याने देण्यास सांगुन 25,000/- हजार रुपये लाचेची मागणी करुन दि.21/02/2024 रोजी पंचासमक्ष स्विकारली म्हणुन त्यांचेविरुध्द फिर्याद आहे.

वरील टंकलिखीत जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation:
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dashrath Shivaji Patil(I (Inspector)) / 1234 or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुंळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Dashrath Shivaji Pat
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1234